नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५३१ /२०१६
निशाणी क्रमांक ६२

## सरतपास वादीं तर्फे वकिल श्रीमती बाबर यांचे मार्फत शपथेवर सुरु

२५. मी माझ्या पुराव्या सोबत नि.क्र.६४ प्रमाणे कागदपत्रांची यादी देवून कागदपत्र दाखल केले आहेत. मी दावा जमीनीचे ७/१२ दाखल केले आहेत त्यांना अनु. **नि.क्र.६६ ते ७४** देण्यात येतात. त्याचप्रमाणे मी मानपाडा पो.स्टेशन येथे दाखल केलेले एफआयआर १९०/२०१५ आणि १९५/२०१५ यांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. त्या दोन्ही पक्षांना मान्य असल्याने त्यांना **नि.क्र.७५ व ७६** अनुक्रमे देण्यात येते. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र.३४५८/२०२४ मधील दि.२६/०८/२०२५ रोजीच्या आदेशाची प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.७७** देण्यात येते. मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८९३०/२०२५ मधील दि.१६/१०/२०२५ रोजी झालेल्या आदेशाची प्रत दाखल केली आहे त्यास **नि.क्र.७८** देण्यात येते. त्याचप्रमाणे दावा जमीनीचे ७/१२ दाखल केले आहेत त्यांस **अनु.नि.क्र.७९ ते ८६** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

## उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते ७ व ९ तर्फे वकील श्री ए. एस. फाटक यांचे मार्फत शपथेवर पुन्हा सुरु

२६. माझे शिक्षण सिनीअर बी.एस.सी. पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहीता वाचता येते. मला इंग्रजी थोडेफार लिहीता, वाचता व बोलता येते. श्री. शंकर काळू पाटील हे माझे आजोबा होते. श्री. रामचंद्र शंकर पाटील हे माझे वडिल होते. माझे आजोबा शंकर पाटील यांना एकूण तीन मुले होती. माझे वडिल रामचंद्र हे त्यांचे सर्वात मुलगा होते. माझे आजोबा मयत झाल्या नंतर माझे वडिल रामचंद्र यांचे नावे त्यांच्या सर्व

मिळकती लागल्या याबाबत मला माहित नाही. दावा मिळकती क्र.२ हया माझे वडिल रामचंद्र यांनी खरेदी केले असल्या बाबत मी फरोक्त खत दाखल केलेले नाही. माझे वडिल रामचंद्र हे दावा मिळकती क्र.२ चे मालक असल्या बाबत मी त्या जमीनीच्या ७/१२ उतारा व्यतिरीक्त अन्य कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत.

२७. हे म्हणणे बरोबर आहे की, दोन्ही दावा मिळकती हया शेत जमीनी होत्या. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे भाउ वामन, रमेश, शरद, सुनिल व राजेश हे त्या सर्व जमीनींवर शेती करत होते. हे म्हणणे बरोबर नाही की, माझ्या वडिलांनी माझे भाउ ज्या जमीनी कसत होते त्या जमीनी त्यांच्या नावे केल्या. सदर वाटण्या हया नोंदणीकृत वाटपाने झाल्या आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, वाटप पत्रा नुसार मला सर्वे नं.१ हिस्स १२/अ मधील पाच गुंठे जमीन मिळाली व सध्या ती माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या जमीनी वर मी घर बांधले आहे. मला आता दि.०९/०७/२०१५ रोजीचे नि.क्र.६५ वरील नोंदणीकृत वाटणीपत्र दाखवण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या वाटणीपत्रा नुसार सदर जमीन माझ्या हिश्यात आली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सर्वे क्र.१ हिस्सा क्र.१५/क मधील १५आर जमीनीवर प्रतिवादी वामन, सुनिल, रमेश, राजेश, शरद व करसन यांची घरे आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की त्याच्या आजुबाजुला मोकळी जागा आहे.

२८. श्रीमती सगुणा यशवंत पाटील, जनाबाई भालचंद्र पाटील व मथुराबाई भोईर हया माझ्या बहिणी आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांची लग्ने झाली असल्यामुळे त्यांना सदर वाटणीपत्रात हिस्सा देण्यात आलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सर्वे क्र.३ हिस्सा क्र.१/ड ही जमीन प्रतिवादी सुनिल यांचे कब्जात असल्याने वाटणीपत्रा नुसार ती त्यांना देण्यात आली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, जुना सर्वे नं.११६, नवीन सर्वे नं.१५७ मधील हिस्सा नं.१२/ब ही जमीन प्रतिवादी रमेश रामचंद्र पाटील यांचे ताब्यात असल्याने त्यांच्या हिश्यात देण्यत आली आहे. हे म्हणणे बरोबर

आहे की, सदर वाटणी पत्रानुसार नवीन सर्वे नं.२ जुना सर्वे नं.२ हिस्सा नं.५/अ ही जमीन प्रतिवादी वामन याचे हिश्यात देण्यात आली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, नवीन सर्वे नं.४, जुना सवे नं.२१८ मधील हिस्सा नं.१ आणि नवीन सर्वे नं.३ जुना सर्वे नं.३ हिस्सा नं.१/क या जमीन शरद रामचंद्र पाटील व राजेश रामचंद्र पाटील यांच्या हिश्यात देण्यात आली आहे. साक्षीदार सांगतात की ते वस्तुस्थीतीला धरुन नाहीत. हे म्हणणे बरोबर आहे की, नवीन सर्वे नं.३ जुना सर्वे नं.३ हिस्सा क्र.१/फ ही जमीन करसन गंगाराम पाटील व राजेश रामचंद्र पाटील हे कसत होते व त्यामुळे ती त्यांच्या हिश्यात देण्यात आली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वाटणीपत्र नि.क्र.६५ वर माझा फोटो, सही व अंगठा आहे. साक्षीदार सांगतो की ते माझ्याकडून जबरदस्तीने करुन घेण्यात आले आहे.

२९. हे म्हणणे बरोबर आहे की, वाटणीपत्र नि.क्र.६५ नुसार महसुल विभागाने फेरफार क्र.२५४५ हा मंजुर केलेला आहे व तो नि.क्र.८९ वर आहे. साक्षीदार सांगतो की, तो मला मान्य नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर फेरफार क्र.२५४५ मी उपविभागीय अधिकारी, कल्याण यांचे समोर आव्हानीत केलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या फेरफारा नुसार दावा जमीनीचे नि.क्र.६६ ते ७४ नुसार स्वतंत्र ७/१२ उतारे झालेले आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, प्रतिवादी क्र.४ रमेश रामचंद्र पाटील यांनी त्यांचे हिश्यात आलेली जमीन मे.गणेशकृपा एंटरप्रयझेस यांना विकली व मे. गणेशकृपा एंटरप्रायझेस यांचे नावे नि.क्र.६७ नुसार जमीनीचा ७/१२ उतारा करण्यात आलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यानुसार सर्वे नं.१ हिस्सा नं.१२/अ या जमीनीचा ७/१२ माझ्या नावाने झाला आहे तो नि.क्र.६८ वर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, ३/१/क ही जमीन रमेश रामचंद्र पाटील यांचे हिश्यात आली होती व ओमसाई डेव्हलपर्स यांना विकसीत करण्यासाठी दिली होती याची मला माहिती नाही. तसेच सर्वे नं.३/१/ड ही जमीन सुनिल रामचंद्र पाटील यांनी विकसीत करण्यासाठी ओमसाई डेव्हलपर्स यांना दिल्याचे मला माहित नाही. सर्वे नं.४/१ ही जमीन राजेश

रामचंद्र पाटील, शरद रामचंद्र पाटील यांनी विकसीत करण्यासाठी ओमसाई डेव्हलपर्स यांना दिल्याचे मला माहित नाही. सर्वे नं.२/५/अ ही जमीन वामन रामचंद्र पाटील यांनी ओमसाई डेव्हलपर्सला दिल्याचे मला माहित नाही.

३०. मी निळजे गावात राहतो. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर दावा जमीनी हया निळजे गावात आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, वर नमुद विकसीत करण्यासाठी दिलेल्या जमीनीवर ओमसाई डेव्हलपर्स यांनी नवीन इमारती बांधल्या आहेत. माझ्या कथनानुसार प्रतिवादी यांनी दि.०९/०७/२०१५ रोजीचे वाटणीपत्र माझ्याकडून धमकावून करण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याबाबत मी लगेचच पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, त्याबाबत मी लगेचच माझ्या वकिलां मार्फत प्रतिवादी यांना नोटीस पाठवलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, मी व माझी मुले यांनी दि.०७/०४/२०१५ रोजी प्रतिवादी यांना मारहाण केल्या बाबत आमच्या विरोधात मानपाडा पो.स्टेशन मध्ये भादवी कलम ३०७ व इतर गुन्हयात एफआयआर नोंदवला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या गुन्हया संदर्भात आम्हाला तुरुंगात ठेवण्यात आले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, ते प्रकरण आजही सत्र न्यायालयात प्रलंबित आहे. साक्षीदार सांगतो की आम्ही देखील त्यांचे विरोधात एफआयआर दाखल केला आहे.

३१. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या कथनानुसार प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र.५ राजेश यांनी मला धमकावले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांनी मला केव्हा, कधी व कुठे धमकावले व वाटणीपत्र लिहून घेतले हे माझ्या दाव्यात नमुद केलेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादी यांनी आमच्या विरोधात भादवि कलम ३०७ दाखल केल्याने मी त्यांच्या विरोधात सदर दावा दाखल केला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मी प्रतिवादी क्र.२ शरद पाटील यांचे विरोधात निळजे गावातील सर्वे नं.२ हिस्सा नं.५/२ या जमीनी संदर्भात विशेष दि.दावा क्र.१६५/२०१९ दाखल केला

आहे व तो दावा या न्यायालयात प्रलंबित आहे. (वादीच्या वकिलांनी सदर प्रश्नास हरकत घेतली व त्यांनी असे नमुद केले की त्याबाबत त्यांचे कैफयीतीत उल्लेख केलेला नाही. त्यांची सदर हरकत अंतिम आदेशा वेळी विचारात घेतला जाईल.) हे म्हणणे बरोबर नाही की, माझे वडिल रामचंद्र पाटील यांनी त्यांचे हयातीत केलेल्या तोंडी वाटणीपत्रला नि.क्र.६५ वरील वाटणीपत्रात अंमलबजावणी करण्यात आली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझ्या व्यतिरीक्त हे वाटणीपत्र कोणीह आव्हानीत केलेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**प्रतिवादी क्र.४ तर्फे उलटतपास श्रीमती म्हात्रे हजर.**

**मध्यंतर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एन.के. जोशी)
३रे सह दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, कल्याण

कल्याण
दिनांक : २४/०३/२०२६

नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५३१ /२०१६
निशाणी क्रमांक ८८

**उलटतपास प्रतिवादी क्र.४ तर्फे वकील श्रीमती म्हात्रे यांचे मार्फत शपथेवर पुन्हा सुरु**

२६. माझे शिक्षण मास्टर ऑफ सिव्हील इंजिनिअर पर्यंत झाले आहे. मी महाराष्ट्र शासनाच्या जल संपदा विभागाच्या ठाणे येथील कार्यालयात उप कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहे. दावा मिळकत क्र.१ व २ मध्ये आमचा हिस्सा असल्या बाबत आम्ही ७/१२ उतारे आणि फेरफार दाखल केले आहे. आमचे एकत्रीत कुटूंब आहे. एखादया व्यवहारा संबंधात निर्णय करायचे असल्यास आम्ही सर्व सदस्य एकत्रीत येवून सर्वांच्या संमतीने निर्णय घेतो. दि.०९/०७/२०१५ रोजी माझे वडिल व काका यांच्यात आमच्या एकत्रीत कुटूंबाच्या मालमत्तेच्या वाटण्या झाल्या त्यावेळी मी माझ्या वडिलां सोबत हजर नव्हतो. त्याकाळात प्रतिवादी आणि आम्ही एकमेकांच्या विरोधात फौजदारी प्रकरणे दाखल केली होती व त्यामुळे मी न्यायालयीन कोठडीत होतो. मी न्यायालयीन कोठडीतून सुटल्या नंतर प्रतिवादींनी मला दावा जमीनीत जावू दिले नाही त्यावेळी मला वाटणी पत्राची माहिती झाली. त्यानंतर मी माझ्या वडिलांकडे त्याबाबत विचारणा केली व त्यांनी मला वाटणी पत्रा बाबत सांगितले. माझ्या वडिलांनी त्या वाटणी पत्रावर सहया केल्या होत्या. त्या वाटणीपत्रा पूर्वी आमच्यात बैठक झाली होती किंवा नाही हे मला माहित नाही, त्यावेळी मी न्यायीक कोठडीत होतो. मी न्यायालयीन कोठडतून आल्या नंतर माझ्या वडिलांनी मला सांगितले की त्या वाटणीपत्रावर धमकावून त्यावर सही घेण्यात आली. त्यावेळी प्रतिवादींनी माझ्या वडिलांना धमकावले होते की, आम्हाला जास्त काळ न्यायालयीन कोठडीत ठेवतील. माझ्या वडिलांच्या त्या वाटणीपत्रावर जबरदस्तीने सहया घेण्यात आल्या होत्या. दि.०६/०५/२०१५ ते १३/०८/२०१५ या कालावधीत मी न्यायालयीन कोठडीत होतो.

२७. मला माझ्या वडिलांच्या वाटणी पत्रा वर जबरदस्तीने सही घेतल्याचे कळले. त्यानंतर माझ्या वडिलांनी त्याबाबत पोलीसात तक्रार केली नाही. त्यावेळी ते डिप्रेशन मध्ये गेले होते व वैदयकिय उपचार घेत होते. मी त्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाहीत. मी ते कागदपत्र दाखल करु शकतो. त्या वाटणी नुसार फेरफार मंजुर करण्यात आला होता व तो आम्ही आव्हानीत केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे योग्य प्रकारे समान वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाटणी पूर्वीच

प्रत्येक हिस्सेदाराकडे त्या त्या जमीनीचा ताबा देण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, नमुद वाटणी पत्र दि.०९/०७/२०१५ हे सर्वांना मान्य होते.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ ते ७ व ९ तर्फे श्री. फाटक वकिल.**

२८. मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात शंकर काळु पाटील यांची वंशावळ दिली आहे ती बरोबर आहे. त्यानुसार रामचंद्र शंकर पाटील यांचे सर्व वारस आज जिवंत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शंकर काळु पाटील यांचे वंशावळी प्रमाणे दावा मिळकती करीता एवढेच वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या वंशावळीत माझे तसेच माझा भाउ विरेंद्र याचे नाव नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझा भाउ व माझा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही.

२९. दावा मिळकत क्र.२ च्या संदर्भात रामचंद्र शंकर पाटील यांचे नावे खरेदी खत किंवा फरोक्त खत असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांना मारहाण केल्या बाबत मी, माझे वडिल व भाउ विरोधात भा.द.वि कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणात मला ०८/०४/२०१५ रोजी अटक करण्यात आली होती. मी दि.०६/०५/२०१५ रोजी न्यायालया समोर शरण गेलो होतो व नंतर मला अटक करण्यात आली. माझा जामीनाचा अर्ज दि.१३/०८/२०१५ रोजी मंजुर झाला होता.

३०. हे म्हणणे खरे आहे की, दि.०९/०७/२०१५ रोजी वाटणी पत्र झाले त्यावेळी मी तुरुंगात होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी वाटणीपत्रावर सही करते वेळी नेमके काय घडले होते याची मला व्यक्तीशः माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तुरुंगातून सुटून आल्या नंतर माझ्या वडिलांनी त्याबाबत सांगितले त्यामुळे मला त्याची माहिती झाली. त्या वाटणीपत्रा वर माझ्या वडिलांच्या जबरदस्तीने सहया घेण्यात आल्या त्याबाबत मी पोलीसात तक्रार अर्ज दिले होते. त्या अर्जाच्या प्रती मी आज दाखल केलेल्या नाहीत. आम्ही त्याबाबत प्रतिवादींना वकिलां मार्फत नोटीसा दिल्या नाहीत. साक्षीदार सांगतो की आम्ही लगेचच हा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या विरुध दाखल करण्यात आलेली फौजदारी केस आजही प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणात मला शिक्षा होवू शकते या भितीने मी प्रतिवादीं विरोधात हा खोटा दावा दाखल केलेला आहे.

३१.	हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या काही भागात इमारती बांधलेल्या आहेत. दावा मिळकतीवर आज शेती होते किंवा नाही हे मला माहित नाही. मी निळजे गावात राहतो. दावा मिळकती बाबत मी, माझे वडिल व भाउ विरेंद्र आमच्यात कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(एन.के. जोशी)
४थे सह दिवाणी न्यायाधीश
वरिष्ठ स्तर, कल्याण

कल्याण
दिनांक : १६/०६/२०२६